साखरेचा वापर ३०० लाख टनांच्या उंबरठ्यावर!

भारतातील साखर वापराचे प्रमाण जागतिक सरासरीच्या दुपटीहून अधिक!

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

देशांतर्गत साखरेचा वापर ३०० लाख मेट्रिक टनाच्या उंबरठ्याला स्पर्श करण्याच्या तयारीत आहे. साखरेचा हा वापर इथेनॉलकडे वळविण्यात येणार्या साखरेव्यतिरिक्त आहे. यामुळे साखरेचा हा वाढता वापर भविष्यात इथेनॉल निर्मितीवर परिणाम करणारा ठरू शकतो. देशात साखरेचा देशांतर्गत वापर प्रतिवर्षी २.२ टक्क्यांनी वाढत आहे. साखरेचा अतिरिक्त वापर, मधुमेहासारख्या जडणाऱ्या आणि जीवनशैलीवर परिणाम करणाऱ्या आजाराला आमंत्रण देणारा ठरतो हे सत्य असले, तरी साखरेच्या वापराविषयी आरोग्य विज्ञानाच्या क्षेत्रात जागृती होऊनही भारतात साखरेचा वापर वाढत आहे.जगभरात हा वापर सरासरी एक टक्क्याने वाढत असला, तरी

उष्णतेच्या लाटेचा हातभार

● यंदा लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बाजारात साखरेची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी केंद्र सरकारने ऑक्टोबर ते मे या आठ महिन्यांमध्ये १९६ लाख मेट्रिक टन साखर रीलिज ऑर्डरच्या माध्यमातून बाजारात आणण्यास परवानगी दिली होती. ही साखर गतवर्षातील याच कालावधीत वितरित केलेल्या साखरेपेक्षा ९ टक्क्याने अधिक आहे. निवडणुकीच्या काळात शीतपेयाचे प्रमाण वाढले गेले. त्याला देशातील उष्णतेच्या लाटेने मोठा हातभार लावला.

भारतात मात्र त्याचे प्रमाण जागतिक सरासरीच्या दुपटीहून अधिक आहे.

भारतात साखरेचे उत्पादन आणि वापर यांच्या गेल्या ६ वर्षांतील आकडेवारीवर नजर टाकली तर भारतातील साखरेच्या वापरात गेल्या सहा वर्षांत सुमारे ४० लाख मेट्रिक टनाने वापर वाढल्याचे निदर्शनास येते आहे. याला प्रामुख्याने साखरेचा व्यापारी वापर जबाबदार आहे. मिठाई आणि शीतपेयांत वापरले जाणारे साखरेचे प्रमाण अधिक आहे. देशात २०२१-२२ मध्ये साखर उत्पादनाने ३५९ लाख मेट्रिक टनाचा उच्चांक गाठला होता. संबंधित साखर वर्षात साखर वापराचे प्रमाण २७० लाख मेट्रिक टनावर गेले होते, तर नुकत्याच संपलेल्या हंगामात ३२० लाख मेट्रिक लाख टन साखर उत्पादित होऊन २९० लाख मेट्रिक टन साखरेचा वापर झाला आहे.

झाकीर नाईकला आंतरराष्ट्रीय आतंकवादी घोषित करा

हिंदू जनजागृती समितीचे निवेदन

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

हिंदू मंदिरांविषयी जातीय विद्वेष पसरवून आतंकवादाला प्रोत्साहन देणाऱ्या इस्लामिक रिसर्च फाऊंडेशनच्या डॉ. झाकीर नाईकला आंतरराष्ट्रीय आतंकवादी घोषित करा,अशी मागणी हिंदू जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने मुंबई जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गुरुवारी जिल्हाधिकारी यांची कार्यालयात शिष्टमंडळाने भेट घेतली. केंद्रीय गृहमंत्र्यांच्या नावाने त्यांना निवेदन देण्यात आले,अशी माहिती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांनी पत्रकाद्वारे दिली.

हिंदू मंदिरात काम करण्यासाठी जाणे सर्वात मोठे महापाप आहे.तसेच मंदिर वा चर्चमध्ये जाण्यापेक्षा हजारो लोकांना मारणाऱ्या शस्त्र बनवणाऱ्या कारखान्यात जाणे अधिक चांगले असे आक्षेपार्ह वक्तव्य नाईक याने एका यू-ट्यूब चॅनलवर मुलाखत देतांना केले आहे.

कृषिमंत्र्यांच्या जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या

विदेशवारीवरून धनंजय मुंडेंना विरोधी पक्षनेत्यांचा टोला

छत्रपती संभाजीनगर : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील शेतकऱ्यांना रांगेत उभे राहून बियाणे खरेदी करायची वेळ आली आहे. त्यांच्या शरीरातून घामाच्या धारा वाहत असताना थंड हवा घेण्यासाठी कृषिमंत्री विदेशवारीला गेले आहेत. एवढेच नव्हे तर मराठवाड्यातील ज्या भागातले कृषिमंत्री आहेत, त्या जिल्ह्यात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. विभागीय बैठकीलाही हे मंत्री उपस्थित नव्हते. मग कशाला मंत्री झाले, असा सवाल विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत केला.

मराठवाड्यात दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. सध्या छत्रपती संभाजीनगरात १५६१ गावांत दुष्काळ आहे. त्यांना टँकरने पाणीपुरवठा होतोय. पण त्यातल्या त्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये मात्र जवळपास ७०० टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. या सगळ्या परिस्थितीमध्ये सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यात झाल्या आहेत. बीडमध्ये २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा अहवाल असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

केंद्रीय मंत्र्यांनी जमिनी बळकावल्या

●रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी लोकांच्या जमिनी बळकावल्या आहेत. केंद्रीय मंत्र्यांनी भोकरदन तालुक्यातील एका कुंभार कुटुंबीयांची जमीन बळकावली. तसेच त्यांची घरेही पाडली. मात्र या कुटुंबाला न्याय देण्यासाठी त्यांचा मुद्दा आम्ही विधानसभेत गाजवू, असा इशारा वडेट्टीवार यांनी दिला.

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, माझ्याकडून फ्लॅट क्र. ७४, बृज कुटिर सोसायटी, एल जगमोहनदास मार्ग, नेपीयनसी रोड, ७ वा मजला, मुंबई-४००००६ या जागेसंदर्भातील ओरिएंट ट्रेडिंग कंपनी राधाकृष्ण बृजलाल रुंगटा, लक्ष्मीनिवास बृजलाल रुंगटा, नरेंद्रकुमार राधाकृष्ण रुंगटा, श्यामसुंदर राधाकृष्ण रुंगटा, मनमोहन लक्ष्मीनिवास रुंगटा आणि मीना मोतिलाल दादलानी यांच्या दरम्यान केलेला मूळ विक्री करार गहाळ झाला आहे. कोणास सापडल्यास तो सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत मला परत करावा.

केतन नानालाल शाह

फ्लॅट क्र. ७४, ७ वा मजला, बृज कुटिर सोसायटी, एल. जगमोहनदास मार्ग, नेपीयनसी रोड, मुंबई - ४०० ००६.

जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, **श्री. प्रकाश राव,** एनएनएनडी एजंट (पिम्पी एजंट) यांना कॅनरा बँक, एनएनएनडी एजंट (पिम्पी एजंट) सेवेतून डिसेंबर, २०१८ पासून अखंडित करण्यात आले आहे.

एनएनएनडी कलेक्शनसंदर्भात **श्री. प्रकाश राव,** एनएनएनडी एजंट (पिम्मी एजंट) यांच्याकडे थकीत कोणत्याही देण्याकरिता कॅनरा बँक, एसएमई मरोळ शाखा (डीपी १५०३२) शाखा व्यवस्थापक (संपर्क क्र.८६५५९६३३३८), पत्ता : कॅनरा बँक, बी - ५९, गिरीराज इंडस्ट्रियल इस्टेट, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व) येथे सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ३० दिवसांच्या आत संपर्क साधावा.

काही दावे उद्भवल्यास, ते सदर जाहीर सूचनेपासून ३० दिवसांच्या आत बँकेच्या लक्षात आणून द्याव्यात व विहित कालावधीपश्चात कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक : ०१.०६.२०२४ सही/-

ठिकाण : मुंबई. शाखा व्यवस्थापक, कॅनरा बँक

त्र्यंबकेश्वरमध्ये विद्यार्थिनीची आत्महत्या

त्र्यंबकेश्वर : महिरावणी येथील संदीप फाऊंडेशन या संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीने येथील खासगी वसतिगृहात आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

ठाणे येथील श्रुती सुरेश जाधव (वय २०) ही विद्यार्थिनी संदीप फाऊंडेशन या संस्थेत शिक्षण घेण्यासाठी महिरावणी येथील खांडबहाले यांच्या खासगी वसतिगृहात होती. बुधवारी सायं. छताला ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत तिचा मृतदेह मिळून आला.

राज्याच्या लाडक्या लालपरीने आज पूर्ण केली ७६ वर्षे

मुंबई: पुढारी वृत्तसेवा

ग्रामीण भागाची जीवनवाहिनी, महाराष्ट्राच्या विकासात सिंहाचा वाटा असलेली राज्यातील आंदोलनातील आंदोलकांचे पहिले टार्गेट असलेल्या लाडक्या लालपरीचा (एसटी)आज १ जून रोजी ७६ वा वाढदिवस आहे. ७७ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या एसटीने आता आधुनिकतेच्या वाटेवर प्रवास सुरु केला आहे.

कुणी एसटी ,कुणी लालपरी तर कुणी लाल डब्बाही म्हणते. परंतु राज्याच्या कानाकोपऱ्यात सेवा देणाऱ्या एसटीचे महत्व मात्र कोणी नाकारु शकत नाही. शहरी भागापासून ते ग्रामीण भागापर्यंत एसटी धावते. ग्रामीण भागातील नागरिकांचे तर एसटी हे प्रमुख वाहतुकीचे साधन आहे. केवळ ३६ बेडफोर्ड बसवर सुरू झालेला हा प्रवास ७६ वर्षात १५ हजार बसेसपर्यंत पोहोचला आहे. ५६० पेक्षा जास्त बस स्थानकांवरून दररोज सरासरी ५५ लाख प्रवाशांची वाहतूक केली जाते.

१ जुन १९४८ रोजी पुणे-अहमदनगर मार्गावर पहिली एसटी धावली. या घटनेला एक जूनला ७६ वर्षे पूर्ण होत आहेत . अर्थात, एसटीचा हा अमृतमहोत्सवी वर्धापन दिन आहे. ७६ वर्षांत एसटीने समाजाला काय दिले, असा ज्यावेळी प्रश्न पडतो,तेव्हा महाराष्ट्राच्या पुरोगामीपणाचा टेंभा अगदी सुरुवातीपासून अभिमानाने मिळवण्याचे धारिष्ट फक्त एसटीने दाखविले. हिंदूंची देव-देवळे, नद्यांचे घाट, उद्याने हे ज्या काळात अस्पृश्य व इतर खालच्या जातींसाठी बंद होते, त्या काळातही एकाच एसटीत सर्व जाती, धर्माचे, पंथाचे लोक बसून एकत्र प्रवास करत होते .

नवीन बस

● कोरोना महामारी व दीर्घकाळ चाललेला कर्मचाऱ्यांचा संपामुळे एसटीच्या नवीन बसची खरेदी ठप्प झाली होती. त्यामुळे जुन्या बस रूपांतरित करून आणखीन काही काळ चालवणे एसटीला भाग होते. सध्या दहा वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान झालेल्या निम्म्यापेक्षा जास्त बस आहेत. त्यामुळे तांत्रिक बिघाडाचे मार्गस्थ बिघाडाचे प्रमाण वाढलेले आहे. प्रवाशांना या त्रासातून मुक्त करण्यासाठी एसटीने नव्या बस खरेदीचा मेगा प्लॅन आखला आहे. विशेष म्हणजे नवीन साध्या लालपरी मध्ये प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न एसटीने केला आहे. मोठ्या खिडक्या, सूर्यप्रकाश आणि हवा खेळती राहील अशी अंतर्गत रचना, पुशबॅक आसने,मोबाईल चार्जिंग करण्याची सोय अशा आधुनिक काळातील सोयी सुविधांनी सज्ज बस प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी महामंडळाने रस्त्यावर उतरवल्या आहेत.

समाजातील शालेय विद्यार्थी-विद्यार्थीनी, दिव्यांग,विविध पुरस्कार प्राप्त व्यक्ती पत्रकारांपासून आता नव्याने सुरू केलेल्या अमृतमहोत्सवी ज्येष्ठ नागरिक व महिला अशा ३० पेक्षा जास्त घटकांना एसटीच्या माध्यमातून दिलेल्या सवलतींमुळे एसटी या सगळ्यांसाठी मायमाऊलीच वाटते.

बंगळूर कांद्याला निर्यात शुल्क माफ, तर महाराष्ट्राला ठेंगा!

सरकारच्या नव्या आदेशामुळे सापत्न वागणुकीची भावना

लासलगाव : पुढारी वृत्तसेवा

बंगळुरूच्या कांद्यावरील ४० टक्के निर्यात शुल्क माफ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. परंतु, महाराष्ट्रातील कांद्यावरील निर्यात शुल्क 'जैसे थे' ठेवल्याने येथील कांदा उत्पादकांच्या जखमेवर मीठ चोळण्याची भावना निर्माण झाली आहे.

कांद्याच्या निर्यात शुल्कबाबत सरकारने नवीन आदेश जारी केला आहे. त्याद्वारे फक्त बंगळुरात रोझ कांद्याला ही सूट देण्यात आली आहे. परिणामी, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशा आली आहे.

महाराष्ट्रातील कांद्यावर अजून निर्यात शुल्क कायम आहे. परिणामी, निर्यात प्रभावित झाली आहे. दुसरीकडे गुजरात व बंगळुरूच्या कांद्याला सूट देण्यात आल्याने तेथून निर्यात वाढून आपसूक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील कांद्यावरील निर्यात शुल्क माफ करावे किंवा कमी करावे, अशी मागणी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य जयदत्त होळकर यांनी केली आहे.

कर्नाटकातील कांदा एक्सपोर्ट गुणवत्तेचा असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. बंगळुरू रोझ हा कांदा कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात जास्त प्रमाणात उत्पादित होतो. मात्र, वेगवेगळ्या राज्यांना वेगवेगळा न्याय आणि महाराष्ट्रावर अन्याय, अशी भावना शेतकऱ्यांची आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

MHADA Portal : https://mhada.gov.in

शुद्धिपत्रक

मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरपात्र इमारतींच्या सन २०२४ च्या नियमित करण्यात येणाऱ्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात धोकादायक आढळलेल्या २० इमारतींची यादी **दि. ३०/०५/२०२४** रोजी या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या धोकादायक इमारतींच्या यादीमधील **अनु क्र.३** वर **''६७ मस्जिद स्ट्रीट''** ऐवजी **''६७ निझाम स्ट्रीट''** असे वाचण्यात यावे.

बाकी सर्व बाबी यथावत राहतील.

सही/-
(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

CPRO/A/405

MHADA-Leading Housing Authority in the Nation

राज्यात खरिपात यंदा १४८ लाख हेक्टरवर होणार पेरणी

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असली तरी १० जुनपासून पडणाऱ्या पाऊस विचारात घेऊन राज्य सरकारकडून खरिप हंगामाचे नियोजन सुरू आहे. यंदाच्या हंगामात राज्यात सुमारे १४८ लाख हेक्टरमध्ये पेरणी होण्याचा अंदाज आहे.या हंगामात ५० लाख हेक्टरमध्ये सोयाबीन तर ४० लाख कापूस, १६ लाख भात, १० लाख मका, ५ लाख बाजरी, १२ लाख तुर आणि प्रत्येकी ४ लाख हेक्टरमध्ये मूग आणि उडीद या पिकांची लागवड होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठी राज्यात सुमारे १९. २८ लाख क्विंटल बियाणांची गरज आहे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडून (महाबीज) पावणे चार लाख क्विंटल, राष्ट्रीय बीज निगमकडून ०. ५९ लाख क्विंटल आणि खाजगी कंपन्यांकडून सुमारे २१ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध होणार आहे. राज्यात सर्व प्रकारच्या बियाण्यांची उपलब्धता असून कुठल्याही प्रकारची बियाण्याची टंचाई नाही, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

साहिवाल गायींचे माहिती संकलन केंद्र मंजूर

मेरठ केंद्रीय गाय संशोधन संस्थेतर्फे निधी मिळणार

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत येथील कृषी महाविद्यालयातील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाला साहिवाल गायींच्या संवर्धन व संशोधनासाठी माहिती संकलन केंद्र (डेटा रेकॉर्डिंग युनिट) मंजूर झाल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी दिली.

नवी दिल्लीतील केंद्राच्या भारतीय कृषी संशोधन संस्थेंतर्गत कार्यरत असलेल्या उत्तर प्रदेशमधील मेरठ केंद्रीय गाय संशोधन संस्थेतर्फे हे केंद्र मंजूर करण्यात आले असून, निधीही दिला जाणार आहे.

देशात दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या साहिवाल गायींच्या आनुवंशिक क्षमतेचे संवर्धन, प्रसार व आनुवंशिक सुधारणा करणे, हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. साहिवाल गायींची सरासरी दूध उत्पादन क्षमता २,५०० ते २,७५० लिटर प्रतिवेत इतकी असून, दुधातील स्निग्धांशाचे प्रमाण ४.५ ते ४.७५ टक्के इतके आहे.

देशातील दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या देशी साहिवाल गायींचे संवर्धन करण्यास या केंद्राच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळेल व त्यामुळे महाराष्ट्रामध्ये देशी गायींच्या दूध उत्पादनवाढीला हातभार लागेल, असे पाटील यांनी सांगितले.

महिलेला रक्त देण्यासाठी फूल विक्रेता ४४० किमी धावून गेला!

शिर्डी : वृत्तसंस्था

अत्यंत दुर्मीळ असा 'बॉम्बे' रक्तगट असलेल्या फूल विक्रेत्याने एका ३० वर्षांच्या महिलेचे प्राण वाचविण्यासाठी ४४० किमीचा प्रवास कारने केला. रवींद्र अष्टेकर (वय ३६) असे या तरुणाचे नाव आहे. त्याचा शिर्डीत व्यवसाय आहे.

इंदूरमधील महाराजा यशवंतराव रुग्णालयात उपचार घेणाऱ्या एका महिलेला याच रक्ताची नितांत गरज होती. तिला अपघाताने 'ओ' पॉझिटिव्ह रक्त दिल्याने तिची प्रकृती ढासळत चालली होती. याची माहिती आपणास रक्तदात्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर मिळाली. आपण एका मित्राच्या कारमधून इंदूरला गेलो, असे अष्टेकर यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. शिर्डीत गेल्या १० वर्षांपासून आपण फूल विक्रीचा घाऊक व्यवसाय करतो, असे त्यांनी सांगितले. बॉम्बे ब्लड ग्रुपचा शोध १९५२ मध्ये लागला. या प्रकारच्या रक्तात एच ॲंटिजेन हा घटक नसतो व एचविरोधी ॲंटिबॉडीज असतात. या रक्तगटाच्या व्यक्तीचे शरीर फक्त हेच रक्त स्वीकारते.

मुंबई विद्यापीठ
University of Mumbai
Re-accredited with A++ Grade
(CGPA 3.65) by NAAC (3rd Cycle 2021)
मुंबई विद्यापीठ
नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभाग
प्रवेश सूचना २०२४- २५ (As per the NEP 2020)
एम. ए. (राज्यशास्त्र)
कालावधी : ४ सत्रे (२ वर्षे)
पात्रता : १) राज्यशास्त्राचे किमान ३ पेपर घेऊन बी. ए.,
२) इतर कोणत्याही विषयातील पदवीधरांना विभागाने घेतलेली 'विषय बदलाची परीक्षा' उत्तीर्ण झाल्यावर प्रवेश दिला जाईल.
तपशीलासाठी आणि नोंदणीसाठी पुढील लिंक पाहा.
प्रवेश नोंदणी : https://muadmission.samarth.edu.in
पुढील ईमेलवर संपर्क साधा : office.udcp@politics.mu.ac.in, दूरध्वनी : २६५३३६०२
संपर्क : नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभाग, फिरोजशहा मेहता भवन, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

Sd/-
Professor & Head
Department of Civics & Politic, University of Mumbai

डीजीआयपीआर/२०२४/२०२५/६३

मुंबई विद्यापीठ
University of Mumbai
Re-accredited with A++ Grade
(CGPA 3.65) by NAAC (3rd Cycle 2021)
मुंबई विद्यापीठ
नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभाग
प्रवेश सूचना २०२४- २५ (As per the NEP 2020)
एम. ए. सार्वजनिक धोरण (स्वयं अर्थसहाय्यित)
कालावधी : ४ सत्रे (२ वर्षे)
पात्रता : कोणत्याही विषयातील पदवी आणि विभागाने घेतलेली 'प्रवेश परीक्षा आणि मुलाखत' उत्तीर्ण झाल्यावर प्रवेश दिला जाईल.
तपशीलासाठी आणि नोंदणीसाठी पुढील लिंक पाहा.
प्रवेश नोंदणी : https://muadmission.samarth.edu.in
पुढील ईमेलवर संपर्क साधा : office.udcp@politics.mu.ac.in, दूरध्वनी : २६५३३६०२
संपर्क : नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभाग, फिरोजशहा मेहता भवन, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

Sd/-
Professor & Head
Department of Civics & Politic, University of Mumbai

डीजीआयपीआर/२०२४/२०२५/६३

प्राइम फोकस लिमिटेड

PRIME FOCUS

नोंदणीकृत कार्यालय : प्राइम फोकस हाऊस, लिंकिंग रोड, सिटी बँकसमोर, खार (पश्चिम), मुंबई-४०००५२. **दूरध्वनी :** ०२२ - ६७१५ ५००० **फॅक्स :** ०२२-६७१५ ५००१ **वेबसाइट :** www.primefocus.com **कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर (सीआयएन) : L92100MH1997PLC108981**

दि. ३१.०३.२०२४ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताचे लेखापरीक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्ष

(रु. लाखांत)

अ. क्र.	तपशील	तिमाहीअखेर			वर्षअखेर	
		३१.०३.२०२४	३१.१२.२०२३	३१.०३.२०२३	३१.०३.२०२४	३१.०३.२०२३
		अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१.	परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	८७३०९.७७	८४०८४.९१	१४३५४८.४९	३९५०५३.७४	४६४४२५.८५
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मकपूर्व)	(११५७९.५१)	(११८१४.१२)	२४२६६.८४	(५८६७०.६१)	३६६१७.६४
३.	करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबीपश्चात)	(११५७९.५१)	(११८१४.१२)	२४२६६.८४	(५८६७०.६१)	३०६१३.४६
४.	करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबीपश्चात)	(८०४१.१३)	(७८९९.८७)	१९०४७.१३	(४८८४९.०४)	१९४४९.०९
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न	(१६२०२.०८)	(१९९००.७७)	९५७५.८७	(६४१६२.५६)	८५३१.९६
६.	समभाग भांडवल	२९९८.४९	२९९५.३७	२९९५.३७	२९९८.४९	२९९५.३७
७.	राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार				४८६०३.६८	(४७७.०८)
८.	उत्पन्न प्रतिशेअर (अपवादात्मक बाबीपूर्व) (निव्वळ कर) (प्रत्येकी रु. १/-) (अवार्षिकीकृत)					
	अ) मूलभूत (रु.)					८.५०
	ब) सौम्यीकृत (रु.)					८.३५
९.	उत्पन्न प्रतिशेअर (अपवादात्मक बाबीपश्चात) (प्रत्येकी रु. १/-) (अवार्षिकीकृत)					
	अ) मूलभूत (रु.)	(२.६८)	(२.६४)	६.३६	(१६.३१)	६.४९
	ब) सौम्यीकृत (रु.)	(२.६८)	(२.६४)	६.२५	(१६.३१)	६.३८

स्थायी वित्तीय निष्कर्षांची महत्त्वाची आकडेवारी (रु. लाखांत)

अ. क्र.	तपशील	तिमाहीअखेर			वर्षअखेर	
		३१.०३.२०२४	३१.१२.२०२३	३१.०३.२०२३	३१.०३.२०२४	३१.०३.२०२३
		अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१.	उलाढाल (निव्वळ विक्री)	११६०.६५	७११.७८	९४५.२५	३३४४.७५	४०७४.२१
२.	करपूर्व नफा/(तोटा)	४०.५२	३२.०४	(१७५.६७)	(६०.८०)	(१३९१.५०)
३.	करपश्चात नफा /(तोटा)	(८६.१६)	५०.९१	(१२३०.२३)	(३४.१५)	(२४४६.०६)

१. वरील तपशील हा सेबी (सूचिबद्धता अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंजेसची वेबसाइट www.nseindia.com व www.bseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट www.primefocus.com वरही उपलब्ध आहे.
२. वरील वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन केले होते व संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ३०.०५.२०२४ रोजी आयोजित सभेमध्ये त्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

प्राइम फोकस लिमिटेडकरिता
सही/- नरेश मल्होत्रा
अध्यक्ष व पूर्णवेळ संचालक
डीआयएन : ०००००४५९७

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०.०५.२०२४

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, संर्भात श्रीमती विणा गणपती, (**''मालक''**) यांच्या खालील लिखीत परिशिष्टामध्ये अधिक विस्ताराने वर्णित प्रिमायसेसच्या (**''प्रिमायसेस''**) संदर्भात अन्वेषण करण्यात येत आहे, जी मालकाने अनुक्रमांक केआरएल-४/३७८७/२०२० अंतर्गत मुंबई येथे सब-रजिस्ट्रार ऑफ अॅश्यूरन्सेस यांच्याकडे नोंदणीकृत १६ मार्च, २०२० दिनांकित सोडपत्रान्वे संपादीत केली आहे.

त्यादृष्टीने, कोणत्याही बँक आणि/ किंवा वित्तीय संस्था आणि/ किंवा प्राधिकरणासह सर्व व्यक्ती/संस्था यांना या जागेच्या संदर्भात किंवा स्वर्गीय के. व्ही. सुब्बारायन आणि श्रीमती विजया सुब्बारायन, मार्फत मालकाचे पालक असल्याने किंवा विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, अभिहस्तांन, गहाण, प्रभार, भेट, न्यास, करार, वारसा, दावा, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, देखभाल, सुलभता, योजना, मृत्युपत्र, भार, कौटुंबिक व्यवस्था/ समझोता, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, करार/करार किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही अधिकार, हक्क, लाभ, स्वारस्य, हिस्सा, दावा किंवा मागणी आहे असल्यास याद्वारे विनंती करण्यात येती की, सदर प्रकाशनापासून **१५ (पंधरा) दिवसांच्या** आत, निम्नस्वाक्षरी-कारांना, ए७०२, विमलाचल सीएचएस, लव्ह लेन, भायखला पूर्व, मुंबई ४०००२७ या पत्त्यावर नोटरीद्वारे प्रमाणित करून लिखित स्वरूपात कळवावे. असे न केल्यास असे अधिकार, हक्क, लाभ, स्वारस्य, हिस्सा, दावा आणि/किंवा मागणी, जर असेल तर, माफ केले गेले आहे आणि/ किंवा सोडले गेले आहे असे मानले जाईल आणि असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे मानण्यात येईल.

परिशिष्ट (आवारात)

८ मार्च १९९८ दिनांकित शेअर सर्टिफिकेट क्र. १०० (जुने शेअर प्रमाणपत्र क्र. १० च्या बदल्यात जारी केलेले) द्वारे साक्षांकित अनुक्रमीत क्रमांक ४६ ते ५० धारक प्रत्येकी रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) च्या ५ (पाच) संपूर्ण भरणा झालेल्या शेअर्ससोबत, भांडुप गावचा सीटीएस क्रमांक ७४०, ७४१, ७४४, ७४५, ७४६, ७४७, ७४८, ७४९ ७५० (भाग), ७५१, ७५२, ७५४ (भाग) आणि ७६१ धारक जमिनीवर स्थित रचना बिल्डींगच्या तीसऱ्या मजल्यावरील मोजमापित ६९२ चौरस फूट चटई क्षेत्रफळाचा फ्लॅट क्र. ए/३०२.

दिनांकित १ जून २०२४

हस्ता/-
मिस किंजल छेडा- वकील

शृंगाराने सजलेली लावणी गौतमी पाटीलमुळे भ्रष्ट झाली !

लोककलावंत गणेश चंदनशिवेंची खंत

मुंबई : पुढारी वृत्तसेवा



लावणी नखापासून केसापर्यंत शृंगाराने सजलेली आहे. मात्र गौतमी पाटीलमुळे लावणी भ्रष्ट झाली, अशी खंत मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांनी बोलून दाखवली. तसेच गौतमी पाटील लावणी करत नाही तर ती आयटम साँग करते, असेही ते म्हणाले.

एका मुलाखतीत बोलताना त्यांनी तमाशाप्रधान चित्रपटातील तमाशाचे चित्रण, तंबूतल्या अस्सल तमाशाची आजची स्थिती, लोकशाहीरांचे योगदान, लोककला अकादमीमधून सुरू असलेला लोककलेचा प्रचार अशा विविध विषयांवर भाष्य केले. ते म्हणाले, 'तमाशाप्रधान चित्रपटात तमाशा नसतो. चित्रपटात जशी सोनाली कुलकर्णी दाखवण्यात आली आहे तशी बोर्डावर दाखवता येत नाही, असे ते म्हणाले.

लावणीला डाग लागला

गौतमी पाटली व तिच्या नृत्यप्रकाराबद्दल बोलताना ते म्हणाले, मध्यंतरी गौतमी पाटीलसारखी मुलगी आली. मुळात गौतमी लावणी करत नसून आयटम साँग करते. लोकांनी ते लावणीवर खपवले आहे. ज्या लावणीने एवढा मोठा इतिहास दिला त्या लावणीला कुठेतरी एक डाग लागल्यासारखा झाला. पुढे तिच्यावर टीका होऊ लागली तेव्हा तिने स्वत: मान्य केले की ती लावणी करत नाही.

लावणीला मोठी परंपरा आहे. शकुबाई, कोल्हापूरकर बाई, लक्ष्मी बाई, यमूना बाईंची परंपरा आहे. डोईवरचा पदर ढळू न देता सुलोचना बाईंनी रजत पटावर लावणी गायली. मात्र आता आयटम साँग गाणे, स्टेजवर एकदम पाण्याचे फवारे टाकणे हे प्रकार सुरू आहेत. त्यामुळे लोकांना वाटतं की अशीच परंपरा आहे. त्यातून आमच्यासारखे लोक मार्ग काढत चालले आहेत, असे ते म्हणाले.

परदेशातील मुलींना घेऊन लावणी केली तरी चालेल पण त्यात पारंपारिक फडावरील मुली असतील तर ते भरुन निघेल. लावणी कधी अर्धनग्न नाही. ती नखापासून केसापर्यंत शृंगाराने सजलेली आहे. तिची चोळी स्लिव्हलेस नाही. तिची पाठ दिसत नाही. तिच्या कंबरेला पट्टा असतो. कासोट्याचे तिचे पातळ आहे. पायात पाच-पाच किलोचे घुंगरू आहेत. ही लावणीची संस्कृती आपण जपली पाहिजे, असे मत देखील त्यांनी व्यक्त केले.

PUBLIC NOTICE

By this notice Public in General is informed that my Clients **1) Smt. Shubhangi Sharad Parab** and **Mrs. Neha Jagdish Parab**, an adults, are the only sole surviving legal heirs of **Late Mr. Sharad Raghoba Parab** who expired on **18/05/2021** and he was member of Vaity Apt. C.H.S. Ltd. holding Flat No. 204 in the building of the society situated at Vaity Apt., Hutatma Chaphekar Bandhu Marg, Mulund (East), Mumbai – 400 081 having Share Certificate No. 17 bearing Distinctive Nos. 81 to 85 and as provided under Rule 25 of MCA Act, 1960 on his death the share mention hereinabove has been transferred in the name of above mentioned nominee namely Smt. Shubhangi Sharad Parab and Mrs. Neha Jagdish Parab in the ratio of 50% each. Apart from the above said nominee / legal heirs if any person/s legal heir/s or any firm/s, financial institute have any claim, right, title and interest by way of heirship, mortgage, lease, agreement for sale, sale deed. Maintenance and/or have any objection for the said transfer as a nominee of the said premises mentioned hereinbelow, hereby invited to raise their objection along with the relevant documents and papers at my below mentioned address within a period of 15 (Fifteen) days from the date of publication of this Notice, the objections which are not received within stipulated period as mentioned herein, will not be considered, and my clients i.e. Smt. Shubhangi Sharad Parab and Mrs. Neha Jagdish Parab will free to feel with any deal. Please take a note of it.

SCHEDULE OF THE SAID PROPERTY
FLAT NO. 204, VAITY APT., HUTATMA CHAPHEKAR BANDHU MARG, MULUND (EAST), MUMBAI – 400 081.

Place: Mumbai
Date: 31/05/2024

Sd/-
Adv. Prakash Sakpal
Office: Behind Charity Commissioner's Office, Opp. Mid town Bldg., Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai- 400 018.

भारतात २९ टक्के प्रौढांकडून तंबाखूचे सेवन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

भारतातील जवळपास २६७ दशलक्ष (१८ वर्षे आणि त्यावरील) प्रौढांपैकी २९ टक्के प्रौढ हे तंबाखूचे सेवन करणारे आहेत, असे ग्लोबल अॅडल्ट टोबॅको सर्व्हे इंडियाच्या निष्कर्षातून पुढे आले आहे. तंबाखूच्या सेवनामुळे कॅन्सरसारखे आजार बळावतात. त्यामुळे किशोरवयीन मुलांमध्ये तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत सातत्याने जागृती करण्याची गरज आहे, असे मत डॉक्टरांनी व्यक्त केले आहे.

शाळा, महाविद्यालयांमधील विद्यार्थी सर्रास तंबाखूचे सेवन करताना दिसतात. प्रतिष्ठेचे चुकीचे निकष,



मित्रपरिवाराचे प्रेशर, हटके काहीतरी करून पाहण्याची उत्सुकता, अशा विविध कारणांमुळे किशोरवयीन मुले तंबाखूकडे आकृष्ट होत आहेत. मात्र, याचे दूरगामी परिणाम शाळा, माध्यमे, शासन या माध्यमांतून पोहचल्यास संभाव्य धोके टाळता येऊ शकतात, अशी माहिती कर्करोगतज्ज्ञ डॉ. कल्पना मेहता यांनी दिली.

तंबाखूच्या सेवनामुळे कर्करोग, फुफ्फुसाचे आजार, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग व स्ट्रोकसह अनेक आजारांना आमंत्रण मिळते. भारतात तंबाखूमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण लक्षणीय आहे. तंबाखू सेवनामुळे दरवर्षी अंदाजे १.३५ दशलक्ष लोकांचा मृत्यू होतो.

तंबाखूचे धोके

● तंबाखूचे दीर्घकाळापर्यंत सेवन केल्याने हिरड्यांचे आजार, दात किडणे व हिरड्यांची झीज होते. या उत्पादनांमधील हानिकारक घटक तोंडाच्या ऊतींना त्रास देतात आणि तोंडाच्या कर्करोगाचा धोका वाढवतात.